2021- 2022


ISSN 2231 671X
UGC Care Listed Journal
तिफण
वर्ष १२ वे अंक १ ला
एप्रिल, मे, जून २०२१
महामानव
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
अभिवादन विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक - पहिला एप्रिल ते जून २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

• संपादक •
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३,



# डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार:एक दृष्टिक्षेप

प्रा.डॉ अनिता व्ही महावादीवार

**भा**रतात आर्थिक विचारांच्या शास्त्रशुध्द मांडणीला एकोणविसाव्या शतकापासून सुरूवात झाली. भारतातील आर्थिक विचारांच्या विकासाचा सखोल अभ्यास करतांना डॉ. आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. बालपणापासून अतिशय कठिण परिस्थितीत जीवन जगत असतांना स्वत:च्या बळावर जिद्दिने पुढे जाऊन विदेशात शिक्षण घेऊन आपले ध्येय गाठणाऱ्या भीमरावांनी शेवटी भारतरत्न, राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून जगात प्रसिध्दी मिळविली. डॉ. आंबेडकरांचे शिक्षण, त्यांचे अनुभव, त्यांची विद्वत्ता, त्यांचे राजकारण अशा प्रत्येक क्षेत्रात त्यांनी योग्य कामगिरी बजावली. समाजकारण आणि राजकारणात तर त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी फार कमी कार्य केले तरी देखील देशाच्या अर्थव्यवस्थेतील प्रत्येक घटकांच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण विचार मांडले. समाजातील दुर्लक्षित असलेल्या दीन, दलितांच्या अत्याचार, अन्यायाविरूध्द त्यांनी चळवळ उभारली. कमी धारण क्षेत्र असलेल्या जमीन मालकांनी नुसते जमिनीचे एकत्रिकरण न करता त्यांचा आकार वाढवून त्यांना किफायतशीर कसे करता येईल हे पटवून दिले. समाजात अबला समजल्या जाणाऱ्या स्त्रीने आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी कसे होता येईल हेच तिला पटवून दिले. लोकसंख्याविषयक धोरण, शिक्षणाचे महत्व, भारतीय रूपयाचा प्रश्न सोडविण्याचे महत्वपूर्ण कार्य, उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्याचे धोरण स्वीकारण्याचा सल्ला देणे, जातिव्यवस्थेचे विचार, राज्य–समाजवादाची संकल्पना अशा प्रत्येक घटकांना स्पर्श करून आपल्या देशातील प्रत्येक व्यक्ती सुखासमाधानाने कसा जगेल अशी तळमळ त्यांनी व्यक्त करून देशाची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गाने कशी वाटचाल करेल असे चिंतनात्मक आर्थिक विचार व्यक्त करणारे अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजेच एक महान आर्थिक विचारवंतच होय.

**बालपण:**

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल, १८९१मधे मध्यप्रदेशातील महु येथील सैन्य छावणीत झाला. डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या वडिलांचे नाव रामजी मालोजी सकपाल आणि आईचे नाव भीमावाई होते. आपल्या आई–वडिलांचे ते चौदावे पुत्ररत्न होते. जन्मजात ते प्रतिभासंपन्न होते. डॉ. आंबेडकर यांचा जन्म महार जातीत झाला. लहानपणी आंबेडकरांच्या कुटुंबासोबत सामाजिक आणि आर्थिक बाबतीत फारच भेदभाव केल्या जात होता. आंबेडकर यांच्या पूर्वजांनी खूप वर्षपर्यंत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सेवेत आपला जीवनकाळ घालविला. त्यांचे वडील सुध्दा ब्रिटिश भारतीय सेनेच्या महू छावणीत सेवेत होते. भीमरावांचे वडील नेहमीच आपल्या मुलांच्या शिक्षणावर जोर देत.

१८९४ ला भीमराव आंबेडकर यांचे वडील सेवानिवृत्त झाले आणि त्यानंतर २ वर्षांनी आंबेडकरांच्या आईचा मृत्यू झाला. आईच्या मृत्यू पश्चात त्यांच्या काकूने अत्यंत कठीणपरिस्थितीत आंबेडकरांच्या बहीण–भावंडांचे पालनपोषण केले. आंबेडकरांच्या वडिलांना बलराम, आनंदराव आणि भीमराव हे तीन मुले व मंजुळा आणि तुळसा अशा दोन मुली

होत्या. आपल्या संपूर्ण बहीण भावंडांमध्ये फक्त भीमराव आंबेडकर यांनीच शिक्षण घेतले. शिक्षण घेत असतांना महादेव अंबावडेकर नावाचे शिक्षक त्यांना लाभले. या शिक्षकांचे ते लाडके विद्यार्थी होते. त्यामुळे त्यांच्या सांगण्यावरून भीमरावांनी आपले सकपाल आडनाव बदलून आंबेडकर ठेवले.

**प्राथमिक शिक्षण:**

आंबेडकरांनी सातारा शहरात राजवाडा चौकातील सरकारी हायस्कूलमधे ७ नोव्हेंबर, १९०० या वर्षी इंग्रजी माध्यमाच्या पहिल्या वर्गात प्रवेश घेतला. याच दिवसापासून त्यांच्या शैक्षणिक जीवनाला प्रारंभ झाला. म्हणूनच ७ नोव्हेंबर हा दिवस महाराष्ट्रात 'विद्यार्थी दिवस' म्हणून साजरा केल्या जातो.

**माध्यमिक शिक्षण:**

भीमरावांनी आपले माध्यमिक शिक्षण एल्फिस्टोन रोड येथील गर्व्हनमेंट हायस्कूलमधे पूर्ण केले.एप्रिल १९०६ ला भीमराव जेव्हा १५ वर्षांचे होते तेव्हा ९ वर्षांची रमाबाई यांच्या सोबत ते विवाहबंधनात अडकले, तेव्हा ते पाचव्या वर्गात शिकत होते. त्यावेळी भारतात बालविवाह प्रचलित होता. १९०७ मध्ये मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण करून एल्फिस्टन कॉलेजमधे प्रवेश घेतला.

**पदवी परीक्षा:**

१९१२ मधे त्यांनी बी. ए. ची पदवी घेतली.

**परदेश गमन:**

१९१३ मधे २२ व्या वर्षी ते संयुक्त अमेरिकेत न्युयार्क येथील कोलंबिया विश्वविद्यालयात पदव्यत्तर शिक्षणासाठी गेले. १९१५ मधे कला शाखेतील स्नातकोत्तर परीक्षा पास झाले. पुढे १९१६ मधे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधे प्रवेश घेऊन अर्थशास्त्रातील आचार्य पदवीचे काम सुरू केले. विदेशात जाऊन अर्थशास्त्रातील आचार्य पदवी घेणारे भीमराव हे पहिलेच भारतीय होते. तेव्हा त्यांनी अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी औद्योगिकरण व कृषीविकास आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी या संशोधनात सामाजिक बाजूचाही विचार करून अध्ययनावर भर दिला. आर्थिक आणि सामाजिक विकास, शिक्षण, सार्वजनिक स्वच्छता, समुदाय स्वास्थ्य इ. बाबींवरही जोर दिलेला दिसून येतो. त्यांनी बिट्रिश सरकारमुळे देशाला होणाऱ्या नुकसानीचीही चिंता व्यक्त केली. १९२१ मधे डॉ आंबेडकर खरोखरच अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखले गेले. जेव्हा हे राजकारणात नेता म्हणून पुढे आले तेव्हा त्यांनी अर्थशास्त्र या विषयातील **'ॲडमिनिस्ट्रेशन ॲड फायनान्स ऑफ दी इस्ट इंडिया कंपनी', द इव्हॅल्युएशन ऑफ प्रॉविन्शियल फायनान्स इन ब्रिटिश', इंडिया द प्रॉब्लेम ऑफ द रूपी: इट्स ओरिजिन ॲन्ड इट्स सोल्युशन'** इ. तीन महत्वपूर्ण पुस्तके लिहिली.

'ॲडमिनिस्ट्रेशन ॲड फायनान्स ऑफ दी इस्ट इंडिया कंपनी' या प्रबंधात आंबेडकर यांनी सन १७९२ ते १८५८ मधे ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित व्यवस्थेमध्ये कसे बदल झाले व ते भारतीयांकरिता कसे अन्यासकारक ठरले याविषयी आपले विचार व्यक्त केले. ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय जनतेची प्रचंड पिळवणूक केली. या काळात कंपनीचा एकूण महसूल ५५ लाख पौंडावरून ३१७ लाख पौड इतका वाढला. यात ५४ टक्के वाटा जमिनीवरील कराचा होता. यामुळे शेतकरी वर्गाची फार पिळवणूक झाली. कर्जाची रक्कम ७० लाख पौंडावरून ६०७ लाख पौड झाली. १८५८ मधे कंपनी बरखास्त झाल्यानंतर ६९३ लाख पौड कर्जाचा बोझा भारतावर होता व त्यामुळे आर्थिक विकासात भारतावर अन्याय करण्यात आला. यापैकी भारतीय जनतेच्या विकासासाठी खर्च नगण्य करण्यात आला, हे त्यांनी स्पष्ट केले.

'द इव्हॅल्युएशन ऑफ प्रॉविन्शियल फायनान्स इन ब्रिटिश' या प्रबंधात त्यांनी १८३३ ते १९२१ या दीर्घकालावधीत केंद्र सरकार व त्यावेळची घटक राज्ये यांच्यातील आर्थिक संबंध कसे विकसित होत गेले याविषयी विचार व्यक्त केले. या

काळात भारताच्या वित व्यवस्थेचे संपूर्ण अधिकारकेंद्रसरकारकडे आलेहोते.म्हणजेच पैसा केंद्रसरकार जमा करेल आणि खर्च करण्याचा अधिकार राज्यांकडे राहील अशी पध्दती होती. सरकारला मिळालेल्या उत्पन्नापैकी अर्धे लष्करावर खर्च केले जाऊन शिक्षण, आरोग्य, रस्ते, कालवे यांकडे दुर्लक्ष करण्यात आले, हे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. आंबेडकर यांनी १९२६ मधे १८३३ ते १९२१ या कालावधीतील भारतीय केंद्र राज्य संबंधांचे मूलगामी व ऐतिहासिक विश्लेषण केले. डॉ. आंबेडकरांच्या मूलभूत मीमांसेमुळे भारतात वित आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यांनी १९२६ मधे मुंबई विधिमंडळात सावकारी प्रतिबंधक विधेयक मांडले. त्यात त्यांनी दोन सूचना केल्या होत्या. पहिली म्हणजे दरवर्षी प्रत्येक सावकाराला नव्याने परवाना घेण्याची सक्ती करावी आणि दुसरी सूचना म्हणजे धनको आणि ऋणको यांचे व्यवहार पारदर्शक होण्यासाठी प्रत्येक धनकोने प्रत्येक ऋणकोला स्वतंत्र पासबुक देऊन त्यात सर्व नोंदी कराव्यात. असे केल्यास कोणीही कर्जदार शेतकऱ्यांची फसवणूक करणार नाही.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कॉंग्रेसचे नेतृत्व असणारे नवे सरकार अस्तित्वात आले. तेव्हा आंबेडकरांना कायदा मंत्री म्हणून आमंत्रित करण्यात आले. २९ ऑगस्ट, १९४७ ला आंबेडकरांना स्वतंत्र भारताच्या नव्या संविधानाच्या रचनेसाठी स्थापन करण्यात आलेल्या संविधान मसूदा समितीच्या अध्यक्ष पदावर नियुक्त करण्यात आले. २६ नोव्हेंबर, १९४९ ला संविधान सभेने संविधानाला स्वीकृती दिली. १४ ऑक्टोबर १९५६ ला नागपूरला आंबेडकरांनी स्वत: आणि त्यांच्या समर्थकांसाठी एक औपचारिक सार्वजनिक समारोहाचे आयोजन केले. आंबेडकरांनी एका बौध्द भिक्षू कडून पारंपारिक पध्दतीने पंचशीलचा स्वीकार करून बौध्द धर्म स्वीकारला.समाजकारण आणि राजकारण यात ते दलितांच्या हक्कासाठी लढले. यासाठी त्यांनी बरेच कार्य केले. त्या तुलनेत त्यांनी अर्थशास्त्रज्ञ म्हणून फार कमी कार्य केले असले तरी समाजातील प्रत्येक घटकांचा विचार केलेला दिसून येतो.

## डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार:

### १. भारतीय चलनाचा प्रश्न (Indian Currency Problem):

लंडनमधे शिक्षण घेत असतांना डॉ. आंबेडकर यांनी ञजीम च्तवइसमउ वा िलचममश हा प्रबंध लिहिला. यात त्यांनी भारतीय रूपया व इंग्लंडचा पौंड यांच्या संबंधाचे अध्ययन केले. भारतीय रूपयाच्या प्रश्नात त्यांनी लॉर्ड कीन्सवर सुध्दा टीका केली. त्यावेळी अर्थशास्त्रज्ञांमध्ये भारतीय रूपयाची जडणघडण ही सुवर्ण परिमाणात असावी की सुवर्ण विनिमय परिमाणात असावी याबाबत वाद निर्माण झाला होता. सामान्यपणे सुवर्ण परिमाणात कागदी चलनाचा वापर होतो. एवढेच नव्हे तर कागदी चलन देऊन सरकारकडून सोने विकत घेता येऊ शकते. या दोन परिमाणांपैकी कोणते परिमाण भारतासाठी योग्य आहे याबाबत वाद होता. प्रा. कीन्स यांनी सुवर्ण विनिमय परिमाणाचा पुरस्कार केला. डॉ. आंबेडकरांनी कीन्सच्या विचारांचा विरोध केला. त्यांच्या मते सुवर्ण विनिमय परिमाणात स्थिरता राहत नाही. त्यामुळे चलन निर्मितीवर मर्यादा राहणार नाही. गरजेपेक्षा जास्त चलननिर्मिती झाली तर भाववाढ होईल, याचा परिणाम रूपयाची किंमत घसरेल व विनिमयाचे साधन म्हणून रूपयाचे स्थान अस्थिर होईल. यासाठी आंबेडकरांनी ऐतिहासिक पुरावेही दिले. त्यात सुवर्ण परिमाणामध्ये वस्तुंच्या किमती स्थिर होत्या, तर सुवर्ण विनिमय परिमाण स्वीकारल्यावर किमती वाढत गेल्या. मात्र त्यावेळेची परिस्थिती आज बदललेली असली तरीही चलननिर्मितीमुळे भाववाढ होते हे आंबेडकरांचे मत आजही नाकारता येत नाही. रूपया आणि पौंड यांचा संबंध ब्रिटिशांचा फायदा करणारा होता. तर भारतावर भार टाकणारा होता. चलन मर्यादित असावे याकरिता डॉ. आंबेडकरांनी दोन मार्ग सूचविले – पहिला मार्ग म्हणजे चलनाचे रूपांतरण करता आले पाहिजे व दुसरा मार्ग म्हणजे चलन किती काढावे यावर मर्यादा घातली पाहिजे.

## २. उद्योगांचे राष्ट्रीयीकरण(Nationalization of Industries):

डॉ. आंबेडकरांनी औद्योगिकरणाला कधीच विरोध दर्शविला नाही, याउलट त्यांनी आधुनिक औद्योगिकीकरणाचा पुरस्कारच केला. मात्र अशा औद्योगिकीकरणातून आर्थिक सत्तेचे व संपत्तीचेकेंद्रीकरण न होता समानता कशी प्रस्थापित होईल यावर त्यांचे चिंतन सुरू असे. भारताच्या अर्थव्यवस्थेकरिता इंग्लंड किंवा अमेरिका या देशांसारखी भांडवलशाही योग्य नाही असे आंबेडकरांचे मत होते. त्यांचा सरकारच्या मालकीच्या उद्योगांना विरोध नव्हता. काही मूलभूत स्वरूपाचे उद्योग सरकारने चालविले पाहिजे यासोबतच सरकारने उद्योग सुरू करण्यासाठी महामंडळेही निर्माण केली पाहिजे, असे त्यांना वाटत होते. उद्योगांचे राष्ट्रीयीकरण झाल्यास खाजगी उत्पादन पध्दतीतील किंवा भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील पिळवणूक थांबेल. श्रीमंत भांडवलदार आणि गरीब कामगार हा भेद नाहीसा होईल. यासोबतच उद्योगधंदे सरकारच्या मालकीचे असल्याने नागरिकांना पेन्शन, आजार यासारखी आर्थिक व सामाजिक सुरक्षितता प्राप्त होईल. सरकारने वितरण व्यवस्था स्वतःच्या नियंत्रणात ठेवावी. जेणेकरून वाजवी किंमतीत जनतेला वस्तू प्राप्त करणे सहज सोपे जाईल. सामाजिक विम्यामुळे उद्योगधंद्याची वाढ होते. त्यामुळे आयुर्विमा उद्योग आणि मोटार वाहतूक उद्योगांचे राष्ट्रीयीकरण व्हावे असे त्यांना वाटत होते. एवढेच नव्हे तर आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांनी सहकारी शेतीचे महत्व पटवून दिले.

## ३. भारतीय शेती–सुधारणा संबंधीचे विचार (Land Reforms):

डॉ. आंबेडकरांनी भारतीय शेतीविषयी आपले विचार १९१८ साली **'The Journal of Indian Economic Society'**मधेप्रकाशित केले. त्यांचा हा लेख 'लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय' या विषयावर आधारित होता. आंबेडकरांच्या मते भारताच्या दृष्टीने शेती हा एक अतिशय महत्वपूर्ण असा व्यवसाय आहे. सर्व प्राथमिक व्यवसायांमधे शेतीचे महत्व सर्वाधिक आहे. शेतीच्या दृष्टीने उत्पादकता ही बाब अतिशय महत्वपूर्ण ठरते. अशा या शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा एक महत्वपूर्ण घटक म्हणजे धारण क्षेत्राचा आकार होय. लहान धारण क्षेत्रामुळे शेतीच्या उत्पादकतेवर कसा प्रतिकूल परिणाम होतो यावर आंबेडकरांनी प्रकाश टाकलेला दिसतो. त्यांच्या मते धारण क्षेत्र आकाराने लहान आहेतच, पण सोबत ती विखुरलेली सुध्दा आहेत. म्हणजे हा केवळ विभाजनाचा प्रश्न नसून अपखंडनाचा सुध्दा आहे. म्हणजेच भारतीय शेतजमिनीचे विभाजन व अपखंडन मोठ्या प्रमाणात झाले असून त्यामुळे शेतीच्या उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. याबाबत अनेक तज्ज्ञांनी आपआपली मते दर्शवून शेतीच्या एकत्रिकरणावर भर दिलेला दिसून येतो. मात्र आंबेडकरांना फक्त एकत्रिकरण करणे एवढेच मान्य नव्हते तर त्यांच्या मते लहान आणि विखुरलेली धारण क्षेत्रे ही आपली मुख्य समस्या आहे. त्यामुळे केवळ एकत्रिकरण करणे पुरेसे नाही, तर त्यांचा आकार वाढवून त्यांना किफायतशीर करणे महत्वाचे ठरते. शेतजमिनीच्या एकत्रीकरणामुळे विखुरलेल्या धारण क्षेत्रांचा प्रश्न सुटेल, मात्र लहान धारण क्षेत्रांचे दुष्परिणाम दूर होणार नाहीत. त्यासाठी क्षेत्रांचा विस्तार करून आर्थिक आकारवर भर द्यावयास हवा.

भारतासारख्या ठिकाणी लहान धारण क्षेत्रे ही समस्या सुटणारी नाही. कारण भारतात वारसा हक्क कायद्याने शेतजमिनीचे तुकडे पडणे हे साहजिकच आहे. म्हणून या उपविभाजनामुळे धारण क्षेत्राचा आकार अनार्थिक होत असेल तर कायद्यानेच त्यांना परवानगी देऊ नये. त्यादृष्टीने कायद्यात सुधारणा करावी असे आंबेडकरांनी सूचविले. डॉ. आंबेडकरांनी शेतीतील उत्पादन वाढीसाठी यंत्रप्रधान शेती, विस्तृत शेते, सहकारी व सामुदायिक शेतीचा पुरस्कार केला. देशातील पडीत जमीन लागवडीखाली आणल्याने भूमिहीनांचा प्रश्न सुटेल याशिवाय शेतकऱ्याला जमिनीची वैयक्तिक मालकी न देता सरकारने जमिनीचे मालक व्हावे या दृष्टीने त्यांनी सामुदायिक शेतीवर भर दिला. आंबेडकरांना देशात स्त्री – पुरूष समानता मान्य होती. त्यामुळे त्यांनी त्याही दिशेने पावले उचललेली दिसून येते.

## ४. भारतीय स्त्रियांची आर्थिक उन्नती (Economic Upliftment of Indian Women ):

भारतीय संस्कृती ही पुरूषप्रधान असल्याने आजही स्त्रियांना कुटुंबात, समाजात मानाचे स्थान नाही. ही बाब आंबेडकरांच्याही लक्षात आल्याने त्यांनी स्त्री मुक्तीचा नारा दिला. देशातील दुर्लक्षित व अबला समजला जाणारा घटक म्हणजे स्त्री होय. जोपर्यंत स्त्रिया आपल्या पायावर आर्थिक दृष्ट्या उभ्या राहणार नाही तोपर्यंत त्या सक्षम होवू शकणार नाही. आणि म्हणून स्त्री सक्षम होणे ही काळाची गरज ठरू लागली आहे. कारण देशातील लोकसंख्येच्या निम्मी लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. म्हणूनच स्त्रिया जोपर्यंत अर्थव्यवस्थेत पुढे येणार नाही तोपर्यंत त्यांचे आणि देशाचे आर्थिक कल्याण होऊ शकत नाही, असे आंबेडकरांचे मत होते. यासाठी स्त्री ही शिकली असली पाहिजे. तसेच तिच्या आरोग्यावरही लक्ष केंद्रित केले गेले पाहिजे. कारण स्त्री ही शिक्षित असली व तिचे आरोग्य जर चांगले असेल तर ती देखील अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देऊ शकते. स्त्रियांनी फक्त चूल आणि मूल इथपर्यंतच मर्यादित न राहता त्यांनी शेती, शिक्षण लघुउद्योग, व्यवसाय इ. क्षेत्रातही समोर यायला पाहिजे. तरच त्यांच्याजवळ पैसे येतील व पैसे आले की त्यातील थोडा का होईना पैशातील हिस्सा बचत करतील आणि त्या सहजच अर्थव्यवस्थेच्या विकासात सहभागी होतील अशी आंबेडकरांची अपेक्षा होती.

**५. शिक्षणासंबंधीचे विचार**

डॉ. आंबेडकरांच्या मते, 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. हे दूध जो कोणी प्राशन करेल तो एक दिवस डरकाळी फोडल्याशिवाय राहणारं नाही.' यावरूनच त्यांनी शिक्षणावर अतिशय भर दिलेला दिसून येतो. दारिद्रय, बेकारी, लोकसंख्या वाढ इ. समस्या सोडविण्यासाठी त्यांनी शिक्षणावर भर दिला. शिक्षणामुळे जनतेची उत्पादक शक्ती व कार्यक्षमता वाढते, बेकारी दूर होते याशिवाय सामाजिक व आर्थिक समानता प्राप्त करता येते. याकरिता शैक्षणिक समानता निर्माण करणे आवश्यक आहे, असे त्यांना वाटत होते.

**६. वाढत्या लोकसंख्येविषयीचे विचारः**

देशातील वाढती लोकसंख्या ही देशहिताची नसून देशाच्या विकासाला बाधक आहे. असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी विधानसभेत लोकसंख्याविषयक नियंत्रण प्रस्ताव १९३८ मधे सादर केला. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी त्यांनी संतती नियमन विधेयक मांडले. वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे दारिद्र्याचा प्रश्न गंभीर बनतो. म्हणूनच देशात अनैतिकता व दुःख फोफावलेले दिसून येते. कारण अनैतिकता व दुःख याचे मूळ कारण म्हणजेच दारिद्रय होय.

**७. नियोजित अर्थव्यवस्थेसंबंधीचे विचारः**

डॉ. आंबेडकरांच्या मते, 'उत्पादनात वाढ करणे व राष्ट्रीय संपत्तीचे समान वाटप करण्यासाठी तरतूद करणे या निकषावर आधारित समाजाच्या आर्थिक जीवनाचे नियोजन करण्याची जबाबदारी सरकारची असते.' राष्ट्राच्या विकासासाठी संपत्तीत वाढझाली पाहिजे, तिचा संग्रह सुध्दा झाला पाहिजे. मात्र संपत्तीचा उपयोग गरीब जनतेस जखडून ठेवण्यासाठी होऊ नये. कारण राष्ट्राच्या संपत्तीच्या केंद्रीकरणामुळे सर्वसामान्यांच्या कल्याणात घट होते. समाजात मूठभर लोकांच्या हाती प्रचंड संपत्ती आणि बहुसंख्य लोकांच्या हाती अल्प संपत्ती केंद्रित झाल्यास सामाजिक कल्याण साधल्या जावू शकत नाही. म्हणूनच देशात नियोजित अर्थव्यवस्था निर्माण करावयाची असेल तर आर्थिक समानता ही गरजेची आहे असेच त्यांना वाटत होते

**८. जातिव्यवस्थेविषयी विचारः**

डॉ. आंबेडकरांच्या मते, जातिव्यवस्था ही श्रमिकांच्या अनैसर्गिक विभागणीस कारणीभूत आहे. त्यामुळे भारताचा आर्थिक विकास व प्रगती खुंटली आहे. त्यांनी मागासवर्गीय बंधुंना वतनदारी व गावकीचे हक्क सोडून देण्याचा संदेश दिला. त्यामुळे अनेकांनी गावकीचे काम सोडून इतर कामे करण्यास सुरूवात केली. त्यांनी आपल्या 'स्टेट्स ॲन्ड मायनॉरिटिज' या ग्रंथात गरिबी हटाव, विषमता निर्मूलन आणि शोषण मुक्त समाज यांवर भर दिला.

९. राज्य—समाजवादाची संकल्पना:

डॉ. आंबेडकरांनी राज्य समाजवाद संकल्पनेत समाजातील आर्थिक रचना कशी असावी याबाबत विचार मांडले. त्यांच्या मते, राज्यघटनेत राजकीय व्यवस्थेच्या स्वरूपाबरोबर आर्थिक रचनेचे स्वरूपही समाविष्ट असले पाहिजे. राज्य समाजवाद अंमलात आणण्यासाठी देशात संसदीय लोकशाही असावी, तेव्हाच भांडवलशाहीतील दोष दूर करता येतात. भांडवलशाहीमुळे मूठभर लोकांच्या हातात आर्थिक शक्तीचे व संपत्तीचे केंद्रीकरण होते, ज्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य वविचारस्वातंत्र्य संपुष्टात येतात. आंबेडकरांना व्यक्तिस्वातंत्र्य अपेक्षित होते. त्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांविषयी तळमळ होती. आर्थिक व सामाजिक परिवर्तन होण्यासाठी राज्याने समाजवाद स्वीकारावा असे त्यांना वाटत होते.

निष्कर्ष :

अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांच्या या अमूल्य आर्थिक विचारांचा अभ्यास केल्यास ते खरोखरच अर्थशास्त्राचे एक आदर्श विचारवंत आहेत असेच दिसून येते. त्यांच्या या अर्थशास्त्रातील योगदान लक्षात घेता नोबेल पुरस्कार प्राप्त अमर्त्य सेन सुध्दा डॉ. आंबेडकरांविषयी आदरयुक्त स्तुती करतांना ते म्हणतात – "Ambedkar is my Father in Economics. His contribution in the field of economics is marvellous and will be remembered forever -----" त्यांनी आर्थिक बाबींचा विचार करतांना देशांच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाशी संबंधित जवळजवळ सर्वच घटकांचा विचार केलेला दिसून येतो. सामाजिक बाबींचा संबंध हा आर्थिक घटकांशी येतो. त्यामुळे सामाजिक घटकांमध्येच जर आधीच योग्य तो मेळ घातल्या गेला तर देशाचा आर्थिक विकास होणे सहज शक्य होईल. हीच बाब त्यांनी आर्थिक विचार स्पष्ट करतांना केलेली दिसून येते.

संदर्भसूची:

१. जिभकाटे, प्रा. बी. एल., 'व्यवसायाचे अर्थशास्त्र', पाचवी आवृत्ती, नोव्हेंबर २०१६, विश्व पब्लिशर्स अॅन्ड डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर.

२. bharatdarshan.co.nz/magazine/article/child/170/ambedkar-biography.html

3. hi.wikipediia.org/wiki/bhimrao_ambedkar

4. Arora, Dr. Guljit K., 'The Rising India and Economic Thinking of Dr. Ambedkar', Academia, Vol. 1, No. 2, Jun-Dec.,2016& Vol. 2, No.1,Jan-June, 2017, ISSN 2395-0161

5. Chavan, Prof. Shalaka Prakash, 'Role of Dr. Babasaheb Ambedkar in Economics', South-Asian Journal of Multidisciplinary Studies, ISSN -2349-7858: SJIF: 2.246: Volume 4, Issue-6.

6. Sunil Kumar, ^Ambedkar's Economic Ideas & Contribution, IOSR Journal of Humanities and Social Science, Volume-24, Issue 3, Ser 1 (March 2019) , E-ISSN, 2279-0837.

साहाय्यक प्राध्यापक
वाणिज्य विभाग
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर